**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७९/१९९४ मधील १८५ ते १८७ वरील एकत्रीत आदेश**

०१. नि.१८५ चा अर्ज अर्जदारतर्फे दावा अवसान पावला आहे तो आदेश रद्द करुन मिळण्यासाठी, नि.१८६ चा अर्ज वादी क्र.१ चे वारस पटलावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मिळण्यासाठी, नि.१८७ चा अर्ज वादीचे वारस दाखल करुन घेवून तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

०२. अर्जदार यांनी नि.१८५ ते १८७ वरील अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, वादी क्र.१ दि.०७/०५/२०२० रोजी दिवंगत झालेला आहे. त्यांना निशाणी क्र.१८७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वादी क्र. १अ ते १क हे कायदेशीर व नजीकचे वारस आहेत. त्यांना अन्य कोणतेही वारस नाहीत. सदर वादी क्र.१ हे मयत झाले तेव्हा कोरोनाचा प्रादुर्भाव होता व संचारबंदी असल्याने वकीलांना भेटून माहिती देता आली नाही. अर्ज दाखल करणेस २ महिन्यांचा विलंब झाला आहे. तो विलंब माफ करुन दावा अवसान पावला आहे तो आदेश रद्द करुन वादीचे वारस पटलावर दाखल करणेस त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. सदर तिनही अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दिले आहे की, योग्य ते आदेश पारित करणेत यावेत.

०४. अर्जदार यांनी वादी क्र.१ चा मृत्यू दाखला निशाणी १९१/१ अन्वये दाखल केला आहे. त्यावरुन वादी क्र.१ मयत आहे हे स्पष्ट होते. वादी क्र.१ हे जरी मयत असले तरी त्यांचे वारस याकामी आवश्यक पक्षकार आहेत कारण त्यांचे हक्क या प्रकरणात अंतर्भुत आहेत व ते दावा पुढे चालवू शकतात. सदरील दावा हा वादी क्र.१ ने हक्कप्रस्थापना व कब्जा वगैरे करीता दाखल केलेला आहे. सदरील प्रकरण कायमपणे निकाली व गुणदोषावर चालण्यासाठी देखील त्यांची आवश्यकता आहे. अर्जदार यांनी दिलेली कारणे देखील समाधानकारक आहेत व विलंब पण जास्त नाही. त्यामुळे अर्ज विनाखर्च मंजूर करणे योग्य ठरेल. अर्जदार यांनी दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी. सदर आदेशाच्या प्रती नि.१८५ ते १८७ यांना लावण्यात याव्यात.

Digitally signed by Swati Hanmantrao Panhale
Date: 2021.02.05 18:06:21 +0530

दिनांकः ०५/०२/२०२१

(श्रीमती एस.एच.पन्हाळे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सावंतवाडी